# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

**Dr. Priya Gedam**
**(I/c.) Director Students' Welfare**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.ac.in/gug.digitaluniversity.ac.in
**Email :** director.dsd@unigug.ac.in
dsd.gug123@gmail.com


पत्र क्र. **No.GU/DSW / 922 /2024** **Dt: 16 /11/2024**

प्रति,

मा. प्राचार्य/विभाग प्रमुख
संलग्नित महाविद्यालय व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय : उत्कृष्ट महाविद्यालय ''निवडणूक कार्यक्रम पुरस्कार स्पर्धा'' २०२४ बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास सादर करण्यात येते की, भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश असून वयाची १८ वर्षे पुर्ण करणारे देशातील नागरिक मतदानाद्वरे या देशाचे सरकार घडवितात आणि हे सरकार घडविण्याची महत्त्वपुर्ण प्रक्रिया म्हणजे निवडणूक आहे. या संबधीत जनगजागृती करीता '**निवडणूक कार्यक्रम उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार स्पर्धा**'' विद्यापीठ स्तरावर अयोजीत करण्यात येत असून सदर स्पर्धे करीता विद्यार्थी विकास विभागस प्रस्ताव प्राप्त झाले. सदर महाविद्यालयांनी सेल्फी कॉनर तयार करून विद्यार्थ्यांचे छायाचित्र संलग्नित केलेल्या लिंक वर अपलोड करण्यात यावे. सदर स्पर्धे करीता लिंक दिनांक २० नोव्हेंबर २०२४ पासून ते २५ नोंव्हेबर २०२४ या कलावधी पर्यंत सूरू राहिल.

धन्यवाद!

(डॉ. प्रिया गेडाम)
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सोबत :

१. गुगल लिंक https://forms.gle/nuts3vUw71n2T4zh7
२. सेल्फी कॉनर चे प्रारूप

**Scan QR**

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## विद्यार्थी विकास विभाग

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक2024**

**उत्कृष्ट महाविद्यालय निवडणूक कार्यक्रम पुरस्कार स्पर्धा 2024**

**महाविद्यालयाचे नाव:**______________________________




# माझे मतदान माझे अधिकार



# *गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली*
# विद्यार्थी विकास विभाग निवडणूक कार्यक्रम
# उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार

***प्रस्तावना* :**

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश असून वयाची 18 वर्षे पूर्ण करणारे देशातील नागरिक मतदानाद्वारे या देशाचे सरकार घडवितात आणि हे सरकार घडविण्याची महत्त्वपूर्ण प्रक्रिया म्हणजे निवडणूक आहे. देशांतर्गत होणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये होणारे मतदानाचे प्रमाण चिंताजनक असल्याचे वास्तव समोर येत आहे. विद्यापीठ आणि विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी हे जवळपास मतदार म्हणून नव्यानेच नोंदणी झालेले असतात. त्यांच्यामध्ये लोकशाहीची मूल्ये रुजावित आणि युवकांमध्ये मताधिकाराची जागृती निर्माण होऊन अधिकाधिक विद्यार्थी मतदानात सहभागी व्हावे, यासाठी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉक्टर प्रशांत बोकारे यांच्या कल्पनेतून विद्यार्थी विकास विभागाच्या अंतर्गत 'निवडणूक कार्यक्रम उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' देऊन महाविद्यालयाचा गुणगौरव करण्यासाठी प्रस्तुत योजना तयार करण्यात आलेली आहे.

***उद्देश*:**

1. युवकांमध्ये मतदानाप्रति जागरूकता निर्माण करणे.
2. महाविद्यालयांना निवडणूक प्रक्रियेसंबंधी अधिक सजग करणे.
3. मतदानाचे गुणोत्तर प्रमाण वाढविणे.
4. लोकशाही बळकटीसाठी प्रयत्न करणे.
5. तरुणाईस जबाबदार नागरिक बनविणे.

***पुरस्कार योजनेचे कार्यक्षेत्र व मर्यादा* :**

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली पदव्युत्तर विभाग आणि गोंडवाना विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये या पुरस्कारासाठी पात्र राहतील.

सदर पुरस्कार केवळ लोकसभा व विधानसभा निवडणुकीतील सहभागाबाबत असेल.

***पुरस्काराचे स्वरूप*:**

1. निवडणूक कार्यक्रम उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार म्हणून निवड झालेल्या महाविद्यालयास दहा हजार रु. राशीचा धनादेश, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन विद्यापीठ वर्धापनदिन कार्यक्रमात गौरविण्यात येईल. तसेच AAA मध्ये 5/10 गुण देण्यात येतील.

2. सहभागाचा प्रस्ताव सादर करून सहभागी झालेल्या प्रत्येक महाविद्यालयांना AAA मध्ये 03 गुण देण्यात येतील.

***नियम* :**

1. विधानसभा व लोकसभा निवडणुकीत ज्या महाविद्यालयाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मतदानाची टक्केवारी सर्वाधिक असेल अशा महाविद्यालयाचा पुरस्काराने गुणगौरव केला जाईल.
2. महाविद्यालयाचे नॅक मानांकन झालेले असणे आवश्यक आहे.
3. सदर कार्यक्रम राबविण्याकरिता गोंडवाना विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाची मान्यता असणे आवश्यक आहे.

4. महाविद्यालयामध्ये मतदान साक्षरता मंडळ स्थापन करणे अनिवार्य आहे.
(मंडळाची रचना खालीलप्रमाणे असावी.)

| | |
|---|---|
| प्राचार्य | अध्यक्ष |
| प्राध्यापक | सदस्य |
| विद्यार्थी प्रतिनिधी | सदस्य |
| विद्यार्थिनी प्रतिनिधी | सदस्य |
| कार्यक्रम समन्वयक | सदस्य सचिव |

5. सदर पुरस्कारासाठी विद्यापीठ पदव्युत्तर विभाग व महाविद्यालयांमधील किमान पाच प्रस्ताव येणे अपेक्षित आहे. तथापि छानननी समितीला स्वतःहून योग्य प्रस्ताव मागवून घेण्याचे अधिकार असतील.

6. छाननी समिती उपरोक्त मुद्द्यांच्या अनुषंगाने उपलब्ध माहितीच्या आधारे छाननी करून योग्य महाविद्यालयाची पुरस्कारासाठी शिफारस करेल.

7. अंतिम निर्णय निवड समिती निर्देशित निकषांच्या आधारे /प्रत्यक्ष मुलाखत घेऊन करेल. सदर समिती माननीय कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली सदस्यांचे नामनिर्देशन करेल.

8. विद्यापीठाकडून प्रदान करण्यात आलेला पुरस्कार हा अपवादात्मक परिस्थितीत परत घेण्याचा सर्वस्वी अधिकार हा विद्यापीठास राहील.

9. प्रत्येक महाविद्यालयाने विद्यार्थी विकास विभागाने दिलेल्या नमुन्यानुसार महाविद्यालयात सेल्फी कॉर्नर बनविणे अनिवार्य आहे. मतदान प्रक्रियेनंतर 3/4 दिवसांच्या आत विद्यार्थ्यांनी मतदान कर्तव्य बजावण्याच्या खुणेसह सेल्फी/ फोटो काढणे अनिवार्य राहील.

10. सदर पुरस्काराकरिता गुगल फॉर्म मध्ये ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव मागविण्यात येतील ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील सेल्फी कॉर्नरवर काढलेल्या सेल्फी/ फोटो अपलोड करणे अनिवार्य राहील.